**महात्मा ज्योतिबा फुले जल व भूमी संधारणअभियान २०१२-१३ मधील अनुषंगिक खर्चासाठी राष्ट्रीय कृषी विकास योजनेतून निधी उपलब्ध करून देण्याबाबत : वितरण आदेश : २**

# महाराष्ट्र शासन

## ग्राम विकास व जलसंधारण विभाग

शासन निर्णय क्र. जलसं-२०१२/प्र.क्र.७६/जल-८
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
**दिनांक : ६ डिसेंबर, २०१२.**

**वाचा :**

१) शासन निर्णय क्र.जलसं-२०१२/प्र.क्र.७६/जल-८, दिनांक ९ ऑगस्ट, २०१२.
२) शासन निर्णय क्र.कृषि व पदुम क्र.राकृविं-२०१२/प्र.क्र.६३/राकृवियो कक्ष, दिनांक २० सप्टेंबर, २०१२.
३) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र.एससीवाय-२०१२/प्र.क्र.३४१/म-७, दिनांक २५ ऑक्टोबर, २०१२ व दिनांक ३० ऑक्टोबर, २०१२.

**प्रस्तावना :**

महात्मा ज्योतिबा फुले जल व भूमी संधारण अभियान २०१२-१३ मधील अनुषंगिक खर्चासाठी राष्ट्रीय कृषि विकास योजनेतून संदर्भाधीन क्र.१ येथील शासन निर्णयानुसार, दिनांक २७ जुलै, २०१२ रोजी सरासरीच्या ५० टक्के पेक्षा कमी पाऊस असलेल्या राज्यातील ६२ तालुक्यांना रू.३०.१० कोटी, तसेच जिल्ह्यांना रू.९.९० कोटी व प्रचार व प्रसिध्दीसाठी रू. ५.०० कोटी असा एकूण रू. ४५.०० कोटी निधी वितरित करण्यात आलेला आहे.

महसूल व वन विभागाने शासन निर्णय क्र.एससीवाय-२०१२/प्र.क्र.३४१/म-७, दिनांक २५ ऑक्टोबर, २०१२ व दिनांक ३० ऑक्टोबर, २०१२ अन्वये राज्यातील ७७ तालुक्यांमधील ५० पैसे वा त्यापेक्षा कमी पैसेवारी (नजर अंदाज) असलेल्या गावांमध्ये टंचाईसदृश परिस्थिती परिस्थिती जाहीर केली आहे. तसेच राज्यात उद्भवलेल्या टंचाई परिस्थिती निवारणार्थ प्राधान्यक्रमाने योजना राबविण्यात याव्यात यासाठी कृषि व पदुम विभागाने संदर्भाधीन क्र.२ येथील शासन निर्णयान्वये महात्मा ज्योतिबा फुले जल व भूमी संधारण अभियानासाठी रू.२५.०० कोटी उपलब्ध करुन दिलेले आहेत. सदर निधी वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्या अनुषंगाने शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :**

महसूल व वन विभागाने शासन निर्णय क्र.एससीवाय-२०१२/प्र.क्र.३४१/म-७, दिनांक २५ ऑक्टोबर,२०१२ व दि.३० ऑक्टोबर,२०१२ अन्वये राज्यातील ७७ तालुक्यांमधील ५० पैसे वा त्यापेक्षा कमी पैसेवारी (नजर अंदाज) असलेल्या गावांमध्ये टंचाईसदृश परिस्थिती जाहीर केली आहे. कृषि व पदुम विभागाने

संदर्भाधीन क्र.२ येथील शासन निर्णयान्वये महात्मा ज्योतिबा फुले जल व भूमी संधारण अभियानासाठी रु.२५.०० कोटी उपलब्ध करुन दिलेले आहेत. यापूर्वी संदर्भाधीन क्र.१ येथील शासन निर्णयान्वये ६२ तालुक्यांना निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला असून, या तालुक्यांव्यतिरिक्त, महसूल व वन विभागाने संदर्भाधीन क्र. २ येथील शासन निर्णयान्वये राज्यातील ज्या ७७ तालुक्यांमधील ५० पैसे वा त्यापेक्षा कमी पैसेवारी (नजर अंदाज) असलेल्या गावांमध्ये टंचाईसदृश परिस्थिती जाहीर केली आहे. संदर्भाधीन क्र.३ येथील दोन शासन निर्णयातील ७७ तालुक्यांतील ६२५० गावांसाठी , गाव हा घटक मानून रु.२३.३७ कोटी निधी वितरित करण्यात येत आहे. तालुकानिहाय वितरित करावयाच्या निधीचे विवरण **"परिशिष्ट-अ"** सोबत जोडण्यात येत आहे. त्या अनुषंगाने मृद् व जलसंधारणाच्या कामांसाठी तालुक्यांना निधी वितरण करावे. तसेच रु.२५.०० कोटी निधीमधून रु.९३ लक्ष निधी प्रचार व प्रसिध्दीसाठी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सदर रु.९३ लक्ष निधी प्रचार व प्रसिध्दीसाठी आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना उपलब्ध करुन देण्यात यावा. यापूर्वीची व आता उपलब्ध होत असलेली प्रचार व प्रसिध्दीसाठीची एकूण रक्कम रु. ५.९३ कोटी होईल.

**३.** सदर योजनेसाठी यापूर्वी वितरित करण्यात आलेला रु.४५.०० कोटी निधी व आता वितरित करण्यात येत असलेला रु.२५.०० कोटी निधी असा एकूण रु.७०.०० कोटी निधीच्या अनुषंगाने १ टक्के रक्कम रु.७० लक्ष सदर योजनेच्या संनियंत्रण व मूल्यमापनाच्या प्रक्रियेसाठी आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे राखून ठेवण्यात येत आहे. सदर मूल्यमापनाची प्रक्रिया महाराष्ट्र राज्य छोट्या शेतक-यांचा कृषि व्यापारी संघ, पुणे व आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या निदेशान्वये पूर्ण करण्यात यावी.

**४.** सदर योजना राबवितांना संदर्भाधीन क्र.१ येथील शासन निर्णयातील कामे/कार्यपध्दती कायम राहील. **तसेच जिल्हाधिकारी यांनी शक्यतो गावांमध्ये कामे हाती घेताना एकत्रितपणे (Cluster Approach) आराखडा तयार करून कामांची अंमलबजावणी करावी. यामुळे अभियानाची परिणामकारकता अधिक दृष्य राहिल.** संदर्भाधीन क्र. १ व २ शासन निर्णयातील सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. तसेच यापूर्वी वितरित केलेला व अखर्चित असलेला निधी व आता वितरित करण्यात येत असलेला सदर निधी ३१ मार्च २०१३ पर्यंत खर्च करण्यात यावा.

**५.** सदर शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक **२०१२१२०६१७३९२३१६२६** असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**( सुनील चव्हाण )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**
मा.राज्यपाल यांचे सचिव,
मा.मुख्यमंत्री यांचे सचिव,

मा.मंत्री (जलसंधारण), यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री, (जलसंधारण) याचे खाजगी सचिव
सर्व मा.मंत्री, राज्यमंत्री याचे खाजगी सचिव,
कार्याध्यक्ष, आदर्शगांव संकल्प व प्रकल्प समिती,
मुख्य सचिव यांचे सहसचिव,
सर्व अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालयीन विभाग,
प्रधान सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
सर्व विभागीय आयुक्त,
आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे,
संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, महाराष्ट्र राज्य, पुणे,
सर्व संचालक, कृषि आयुक्तालय, पुणे,
मुख्य अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर), पुणे
प्रधान मुख्य वनसंरक्षक व संचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
सर्व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
सर्व प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,
सर्व उपायुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय ( सर्व),
सर्व विभागीय कृषि सहसंचालक,
सर्व अधीक्षक अभियंता, पाटबंधारे,/ सर्व अधीक्षक अभियंता, लघु पाटबंधारे, (स्थानिक स्तर)
संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई,
महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मुंबई (प्रसिध्दीकरीता ),
सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,
सर्व मुख्य वन संरक्षक व उपसंचालक, सामाजिक वनीकरण वृत्ते,
सर्व सहसंचालक, सामाजिक वनीकरण वृत्ते,
सर्व मुख्य वनसंरक्षक,/ सर्व उपवनसंरक्षक,
वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,
महाराष्ट्र राज्य जलसंधारण सल्लागार परिषदेचे सर्व अशासकीय सदस्य,
महालेखापाल, (लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य १ व २, मुंबई व नागपूर,
महालेखापाल, (लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य १ व २, मुंबई व नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभाग,
कार्यासन अधिकारी (राकृवियो कक्ष), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
सर्व उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, (जलसंधारण उप विभाग), मंत्रालय, मुंबई-३२.
जल-८ (निवड नस्ती), ग्रा.वि.व ज.सं.विभाग, मंत्रालय, मुंबई

**महात्मा ज्योतिबा फुले जल व भूमी संधारण अभियान २०१२-१३ मधील अनुषंगिक खर्चासाठी राष्ट्रीय कृषि विकास योजनेतून निधी उपलब्ध करून देणेबाबत : वितरण आदेश : २**
**शासन निर्णय क्र.जलसं-२०१२/प्र.क्र.७६/जल-८, दिनांक ६ डिसेंबर, २०१२.**
**परिशिष्ट "अ"**

| अ.क्र. | जिल्हा | तालुके | ५० पैसे किंवा त्यापेक्षा कमी नजर आणेवारी असलेली गावे | देय निधी रक्कम (रू.) | शा.नि.दि. ९/८/२०१२ अन्वये ५० पैसे पेक्षा कमी आणेवारीत समाविष्ट असलेल्या तालुक्यांना वितरित केलेला निधी (रू.) | आता वितरित करावयाचा निधी (रू.) (५-६) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | नाशिक (७) | येवला | १२४ | ७५०४३५६ | ० | ७५०४३५६ |
| २ | | **सिन्नर** | १२८ | ७७४६४३२ | **४८५४०००** | २८९२४३२ |
| ३ | | मालेगांव | १५० | ९०७७८५० | ० | ९०७७८५० |
| ४ | | नांदगांव | १०० | ६०५१९०० | ० | ६०५१९०० |
| ५ | | चांदवड | ९५ | ५७४९३०५ | ० | ५७४९३०५ |
| ६ | | **देवळा** | **१७१** | १०३४८७४९ | **४८५४०००** | ५४९४७४९ |
| ७ | | बागलाण | ३५ | २११८१६५ | ० | २११८१६५ |
| ८ | धुळे (१) | साक्री | ७८ | ४७२०४८२ | ० | ४७२०४८२ |
| ९ | जळगांव (८) | भडगांव | ६३ | ३८१२६९७ | ० | ३८१२६९७ |
| १० | | **भुसावळ** | **४१** | २४८१२७९ | **४८५४०००** | ० |
| ११ | | **चाळीसगांव** | **१३६** | ८२३०५८४ | **४८५४०००** | ३३७६५८४ |
| १२ | | **जळगांव** | **९२** | ५५६७७४८ | **४८५४०००** | ७१३७४८ |
| १३ | | **जामनेर** | **१५२** | ९१९८८८८ | **४८५४०००** | ४३४४८८८ |
| १४ | | **मुक्ताईनगर** | **८१** | ४९०२०३९ | **४८५४०००** | ४८०३९ |
| १५ | | पाचोरा | १२८ | ७७४६४३२ | ० | ७७४६४३२ |
| १६ | | **बोदवड** | **५१** | ३०८६४६९ | **४८५४०००** | ० |
| १७ | अहमदनगर(१०) | अहमदनगर | ५ | ३०२५९५ | ० | ३०२५९५ |
| १८ | | राहुरी | १७ | १०२८८२३ | ० | १०२८८२३ |
| १९ | | नेवासा | १३ | ७८६७४७ | ० | ७८६७४७ |
| २० | | **शेवगांव** | **३३** | १९९७१२७ | **४८५४०००** | ० |
| २१ | | **पाथर्डी** | **८०** | ४८४१५२० | **४८५४०००** | ० |
| २२ | | **पारनेर** | **३१** | १८७६०८९ | **४८५४०००** | ० |
| २३ | | अकोला | १०५ | ६३५४४९५ | ० | ६३५४४९५ |
| २४ | | संगमनेर | १२४ | ७५०४३५६ | ० | ७५०४३५६ |
| २५ | | कोपरगांव | १६ | ९६८३०४ | ० | ९६८३०४ |
| २६ | | राहता | २४ | १४५२४५६ | ० | १४५२४५६ |

**महात्मा ज्योतिबा फुले जल व भूमी संधारण अभियान २०१२-१३ मधील अनुषंगिक खर्चासाठी राष्ट्रीय कृषि विकास योजनेतून निधी उपलब्ध करून देणेबाबत : वितरण आदेश : २**
**शासन निर्णय क्र.जलसं-२०१२/प्र.क्र.७६/जल-८, दिनांक ६ डिसेंबर, २०१२.**
**परिशिष्ट "अ"**

| अ.क्र. | जिल्हा | तालुके | ५० पैसे किंवा त्यापेक्षा कमी नजर आणेवारी असलेली गावे | देय निधी रक्कम (रू.) | शा.नि.दि. ९/८/२०१२ अन्वये ५० पैसे पेक्षा कमी आणेवारीत समाविष्ट असलेल्या तालुक्यांना वितरित केलेला निधी (रू.) | आता वितरित करावयाचा निधी (रू.) (५-६) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| २७ | पुणे(७) | **भोर** | **९९** | ५९९१३८१ | **४८५४०००** | ११३७३८१ |
| २८ | | **पुरंदर** | **६२** | ३७५२१७८ | **४८५४०००** | ० |
| २९ | | **शिरूर** | **५५** | ३३२८५४५ | **४८५४०००** | ० |
| ३० | | **जुन्नर** | **३१** | १८७६०८९ | **४८५४०००** | ० |
| ३१ | | **खेड** | **१८** | १०८९३४२ | **४८५४०००** | ० |
| ३२ | | आंबेगांव | २ | १२१०३८ | ० | १२१०३८ |
| ३३ | | **हवेली** | **९०** | ५४४६७१० | **४८५४०००** | ५९२७१० |
| ३४ | सातारा (७) | **सातारा** | **५७** | ३४४९५८३ | **४८५४०००** | ० |
| ३५ | | **जावळी** | **४७** | २८४४३९३ | **४८५४०००** | ० |
| ३६ | | **कोरेगांव** | **१४०** | ८४७२६६० | **४८५४०००** | ३६१८६६० |
| ३७ | | कराड | १५ | ९०७७८५ | ० | ९०७७८५ |
| ३८ | | **माण** | **१०६** | ६४१५०१४ | **४८५४०००** | १५६१०१४ |
| ३९ | | **खटाव** | **१४०** | ८४७२६६० | **४८५४०००** | ३६१८६६० |
| ४० | | **वाई** | **४१** | २४८१२७९ | **४८५४०००** | ० |
| ४१ | सांगली (८) | मिरज | ४४ | २६६२८३६ | ० | २६६२८३६ |
| ४२ | | **जत** | **५३** | ३२०७५०७ | **४८५४०००** | ० |
| ४३ | | खानापूर | ६६ | ३९९४२५४ | ० | ३९९४२५४ |
| ४४ | | तासगांव | ६९ | ४१७५८११ | ० | ४१७५८११ |
| ४५ | | आटपाडी | २६ | १५७३४९४ | ० | १५७३४९४ |
| ४६ | | **कवठेमहांकाळ** | **६०** | ३६३११४० | **४८५४०००** | ० |
| ४७ | | **पलुस** | **६** | ३६३११४ | **४८५४०००** | ० |
| ४८ | | कडेगांव | ५६ | ३३८९०६४ | ० | ३३८९०६४ |
| ४९ | औरंगाबाद (७) | **गंगापूर** | **२२२** | १३४३५२१८ | **४८५४०००** | ८५८१२१८ |
| ५० | | **पैठण** | **१९०** | ११४९८६१० | **४८५४०००** | ६६४४६१० |
| ५१ | | **कन्नड** | **३८** | २२९९७२२ | **४८५४०००** | ० |
| ५२ | | फुलंब्री | ६८ | ४११५२९२ | ० | ४११५२९२ |

**महात्मा ज्योतिबा फुले जल व भूमी संधारण अभियान २०१२-१३ मधील अनुषंगिक खर्चासाठी राष्ट्रीय कृषि विकास योजनेतून निधी उपलब्ध करून देणेबाबत : वितरण आदेश : २**

**शासन निर्णय क्र.जलसं-२०१२/प्र.क्र.७६/जल-८, दिनांक ६ डिसेंबर, २०१२.**

**परिशिष्ट "अ"**

| अ.क्र. | जिल्हा | तालुके | ५० पैसे किंवा त्यापेक्षा कमी नजर आणेवारी असलेली गावे | देय निधी रक्कम (रू.) | शा.नि.दि. ९/८/२०१२ अन्वये ५० पैसे पेक्षा कमी आणेवारीत समाविष्ट असलेल्या तालुक्यांना वितरित केलेला निधी (रू.) | आता वितरित करावयाचा निधी (रू.) (५-६) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| ५३ | | औरंगाबाद | १५९ | ९६२२५२१ | ० | ९६२२५२१ |
| ५४ | | सोयगांव | २९ | १७५५०५१ | ० | १७५५०५१ |
| ५५ | | सिल्लोड | ४७ | २८४४३९३ | ० | २८४४३९३ |
| ५६ | जालना (८) | **भोकरदन** | **१५७** | ९५०१४८३ | **४८५४०००** | ४६४७४८३ |
| ५७ | | **अंबड** | **१३८** | ८३५१६२२ | **४८५४०००** | ३४९७६२२ |
| ५८ | | **बदनापूर** | **९१** | ५५०७२२९ | **४८५४०००** | ६५३२२९ |
| ५९ | | **घनसावंगी** | **११७** | ७०८०७२३ | **४८५४०००** | २२२६७२३ |
| ६० | | **मंठा** | **११७** | ७०८०७२३ | **४८५४०००** | २२२६७२३ |
| ६१ | | जाफराबाद | १०१ | ६११२४१९ | ० | ६११२४१९ |
| ६२ | | जालना | १५१ | ९१३८३६९ | ० | ९१३८३६९ |
| ६३ | | परतूर | ९८ | ५९३०८६२ | ० | ५९३०८६२ |
| ६४ | बीड (५) | बीड | ११३ | ६८३८६४७ | ० | ६८३८६४७ |
| ६५ | | **आष्टी** | **१७७** | १०७११८६३ | **४८५४०००** | ५८५७८६३ |
| ६६ | | **गेवराई** | **१९३** | ११६८०१६७ | **४८५४०००** | ६८२६१६७ |
| ६७ | | **शिरूर** | **९५** | ५७४९३०५ | **४८५४०००** | ८९५३०५ |
| ६८ | | पाटोदा | १०७ | ६४७५५३३ | ० | ६४७५५३३ |
| ६९ | परभणी (१) | जिंतूर | ३० | १८१५५७० | ० | १८१५५७० |
| ७० | उस्मानाबाद (७) | उस्मानाबाद | ५९ | ३५७०६२१ | ० | ३५७०६२१ |
| ७१ | | उमरगा | ८० | ४८४१५२० | ० | ४८४१५२० |
| ७२ | | भूम | ६ | ३६३११४ | ० | ३६३११४ |
| ७३ | | कळंब | ९७ | ५८७०३४३ | ० | ५८७०३४३ |
| ७४ | | लाहोरा | ३७ | २२३९२०३ | ० | २२३९२०३ |
| ७५ | | तूळजापूर | ११७ | ७०८०७२३ | ० | ७०७६३४९ |
| ७६ | | वाशी | ४२ | २५४१७९८ | ० | २५४१७९८ |
| ७७ | बुलढाणा (१) | सिंदखेड राजा | १८ | १०८९३४२ | | १०८९३४२ |
| | | **एकूण** | ६२५० | | | २३३७००००० |